## प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/573/२०२४ पुणे

दिनांक - १६/०८/२०२४

**सर्व वाहतुक विभाग पुणे शहर अंतर्गत**

दि.१७/०८/२०२४ रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य हे " मुख्यमंत्री - माझी लाडकी बहिण योजनेचा" उद्घाटन कार्यक्रमास बालेवाडी येथे उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमासाठी मा. उप मुख्यमंत्री महा. राज्य, व मोठया संखेने कार्यकर्ते व जनसमुदाय उपस्थित राहणार असल्याने बालेवाडी स्टेडिअम परिसरात वाहतुक कोंडी होण्याची शक्यता असल्याने वाहतुकी मध्ये खालील प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात बदल करण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करत आहे.

**दि. १७/०८/२०२४ रोजी ००.०१ वा. ते २४.०० वा दरम्यान**

**कात्रज चौकाच्या पुढे नवले ब्रीज मार्गे मुंबई-बेंगलोर बायपास रोडवर सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना प्रवेश बंद राहिल.**

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा पुणे शहर

प्रति,

**१)जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- **२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ४,** पुणे शहर.

**३) पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**४)सर्व प्रभारी अधिकारी वाहतुक विभाग, पुणे शहर.**
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित यांना तात्काळ अदा करून, यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

**५)पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

**६)पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.